## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७ /०१/२०१७

**१) घरघुती कारणावरुन भांडण करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/०१/२०१७ चे १८.०० वा. यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन घरघुती कारणावरुन फिर्यादी सोबत भांडण करुन आरोपीने फिर्यादीचे घराचे अंगणात बांभळीच्या काठया लावल्या त्या काठया फिर्यादी काढण्यास गेला असता आरोपी क्र. १ याने फिर्यादीच्या डोक्यावर लोखंडी सब्बल मारुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादीचा मुलगा सचीन गोपीचंद मिसार वय २० वर्ष, हा भांडणामध्ये जखमीच्या मदतीस गेला असता आरोपी क्र. २ हिने डोक्यावर काठीने व गालावर थापड बुक्यांनी मारहान केल्याने फिर्यादी गोपीचंद महादेव मिसार वय ४६ वर्ष, रा. डोंकेसरांडी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०७,३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. भोयर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अवैद्यरित्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/०१/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने मालकाचे सांगनेवरुन आपल्या ताब्यातील जे. सी. पी मशीन व्दारे अवैद्य रित्या चोरीने साठवुन ठेवलेली रेती २ ट्रक मध्ये प्रत्येकी ४—४ ब्रास रेती एकुण ८ ब्रास रेती कि. १६,०००/—रु. ची भरुन दिली व घटना स्थळावरुन ट्रक घेवुन पळवुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भाजीपाले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,३४,१०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खोकले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन जातीवाचक शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/०१/२०१७ चे १३.३० वा. दर. यातील ग्रामपंचायत कार्यालय गोंडउमरी येथे फिर्यादी हा हजर असतांना ग्रामसेवीका हिला मासीक सभेची प्रोसीडींग व कॅश बुक मागीतले असता यातील दोन्ही आरोपीतांनी फिर्यादी सोबत तोंडातोंडी भांडण करुन दोघेही गेटचे बाहेर निघाले त्याचवेळी फिर्यादी हा सुध्दा बाहेर निघाला असता त्याला आरोपीतांनी जातीवाचक शब्द उच्चार करुन तुला जेथे जायचे आहे तेथे जा तुला मासीक सभेची प्रोसीडींग दाखवत नाही अशा जातीवाचक अश्लिल शब्दात शिविगाळ करुन सार्वजनीक ठिकाणी पाण उतारा केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली कलम ३(१)(आर)(एस)अ.जा.ज.अ.प्र.का सहकलम २९४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास श्री.जोगदंड उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकाने सायकल चालकास धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/०१/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांना सायकल स्वार चालक देवराम पैकु डहारे वय ४० वर्ष, रा. निष्टी यास धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादी जयराम टेकु डहारे वय ३५ वर्ष, रा. निष्टी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोस्टे पवनी हे करीत आहेत.

**५) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे, दोन जखमी . :—**

दिनांक ०५/०१/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील जखमी राकेश उरकुडकर वय १९ वर्ष, रा. दोन्ही रा. घोडेघाट वार्ड पवनी हे पल्सर मोटार सायकलने जात असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन जखमीचे मोटार सायकलला आदर्श आमगाव रेल्वे क्रासींग समोर येथे धडक मारुन दोघानांही जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने डॉ. रिपोर्ट व चौकशी वरुन पोस्टे पवनी येथे कलम २७९,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पोस्टे पवनी हे करीत आहेत.

**६) अवैध जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०६/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा व गोबरवाही येथील जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून जुगारातुन कि. ५,३५५/—रू जप्त करण्यात आला आहे.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.